आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दु. ३.००वाजता

४ डिसेंबर२०२१ - शनिवार

**ठळक बातम्या**

- लोकलेखासमितीमुळेसंसदीयव्यवस्थेतविवेक,ज्ञानासक्तीआणिशिष्टाचारटिकूनराहिलाअसल्याचंराष्ट्रपतीरामनाथकोविंदयांचंप्रतिपादन
- **MPSC** कडूनपुढच्यावर्षीच्यापरीक्षांचेवेळापत्रकजाहीर
- साहित्यसंमेलनातआजगझलसंमेलनआणिबालकुमारमेळावा, विद्रोहीसाहित्यसंमेलनालाहीसुरुवात
- सोलापूरातलेजिल्हापरिषदेचेशिक्षकरणजितसिंहडिसलेयांनाफुलब्राइटशिष्यवृत्तीजाहीर
- भारतआणिन्यूझीलंडयांच्यातल्यादुसऱ्याकसोटीतन्यूझीलंडचाफिरकीपटूएजाजपटेलयाचाएकाचडावातसर्व१०गडीबादकरायचाविक्रम / न्यूझीलंडचापहिलाडावहीगडगडला

**<><><><>**

**कोविड १९ प्रतिबंधक लसीकरणात भारत १५० कोटी मात्रा देण्याकडे वेगानं वाटचाल करतो आहे. त्याचवेळी कोरोनाच्या नवनव्या प्रकारांच्या बातम्या चिंता वाढवत आहेत. अशावेळी आम्ही श्रोत्यांना आवाहन करतो की, लवकरात लवकर पूर्ण लसीकरण करुन घ्या तसंच इतरांनाही लसीकरणासाठी प्रोत्साहित करा. त्याबरोबरच कोरोना प्रतिबंधक नियम पाळा, गर्दी टाळा, मुखपट्टी अवश्य वापरा आणि हात वेळोवेळी स्वच्छ धुवा.**

**कोरोनाशी संबंधित योग्य माहिती, मार्गदर्शन आणि मदतीसाठी राज्याच्या ०२० - २६१२७३९४ या मदत क्रमांकावर संपर्क साधा...**

**<><><><>**

संसदेच्या लोकलेखा समितीमुळे संसदीय व्यवस्थेत विवेक, ज्ञानासक्ती आणि शिष्टाचार टिकून राहिला असल्याचं राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी म्हटलं आहे. ते आज संसदेच्या लोकलेखा समितीच्या शताब्दी महोत्सवाला संबोधित करत होते. सार्वजनिक जीवन निर्मळ असावं यासाठी व्यवहारांची नोंद महत्वाची असल्याचं महात्मा गांधी यांचं मत होतं असंही राष्ट्रपतींनी अधोरेखीत केलं.

उपराष्ट्रपती एम.व्यंकैय्या नायडू आणि लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. लोकलेखा समितीच्या अहवालांतून व्यवस्थेत नियमितपणे सुधारणा केल्या जातात. आजवर समितीनं अनेक आर्थिक त्रूटींचा शोध लावून त्या सुधारण्याचं काम केलं आहे असं उपराष्ट्रपती यावेळी म्हणाले. एका वर्षात संसदेत किमान १०० दिवसांचं कामकाज व्हायला हवं असंही नायडू यांनी यावेळी सुचवलं.

लोकलेखा समिती ही संसदेचा सर्वात महत्वाचा घटक असून, समितीच्या सदस्य समर्पण वृत्तीनं काम करत आहेत अशा शब्दांत लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी समितीच्या कार्याचा गौरव केला.

**<><><><><>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीनं पुढच्या वर्षी घेतल्या जाणार असलेल्या स्पर्धा परीक्षांचं वेळापत्रक आज आयोगानं जाहीर केलं. यानुसार राज्य सेवा पूर्व परीक्षा पुढच्या वर्षी २ जानेवारीला, तर ७, ८, आणि ९ मे २०२२ला मुख्य परीक्षा होणार आहे. दुय्यम सेवा परीक्षांसाठी पुढच्या वर्षी २६ फेब्रुवारीला पूर्व परीक्षा होणार आहे, तर त्याअंतर्गत विविध पदांसाठीच्या मुख्य परीक्षा पुढच्या वर्षी जुलै महिन्यात ९, १७, २४ आणि ३१ तारखेला होणार आहेत. गट क सेवा संयुक्त परीक्षेसाठीची जाहीरात चालू महिन्यात काढली जाणार आहे. तर पूर्व परीक्षा पुढच्या वर्षी एप्रिल महिन्यात होणार आहे. याअंतर्गत विविध पदांसाठीच्या मुख्य परीक्षा पुढच्या वर्षी ऑगस्ट महिन्यातच्या ६, १३, २० आणि २७ तसंच सप्टेंबर महिन्याच्या १० आणि १७ तारखेला होणार आहेत.

पुढच्या वर्षी एप्रिल महिन्यात राज्य सेवा परीक्षांसाठी जाहीरात काढली जाईल, आणि त्यानंतर १९ जुन २०२२ ला पूर्व परीक्षा तर १५, १६ आणि १७ ऑक्टोबर २०२२ला मुख्य परीक्षा घेतली जाईल.

जुन २०२२ मध्ये अराजपत्रित दुय्यम सेवा परीक्षांसाठीची जाहीरात निघेल, आणि त्यानंतर ८ऑक्टोबर २०२२ला पूर्व परीक्षा घेतली जाईल. यासाठी मुख्य परीक्षेची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही.

गट क सेवा संयुक्त परीक्षेसाठीची जाहीरातही पुढच्या वर्षी जून महिन्यात काढली जाणार आहे. यासाठीची पूर्वपरीक्षा ५ नोव्हेंबर २०२२ला घेतली जाईल, मात्र मुख्य परीक्षेची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही.

**<><><><><>**

हिंगोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांनी कोविड प्रतिबंधात्मक लस घेणाऱ्या नागरिकांसाठी 'बंपर लसीकरण ड्रॉ' ही बक्षीस योजना राबवण्याची घोषणा केली आहे. कोविड लसीचे दोन्ही डोस घेणाऱ्या नागरिकांची सोडत काढून, विजेत्यांना एल.ई.डी.टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशीन, मिक्सर ग्राइंडर अशा वस्तू मिळणार आहेत. दोन डिसेंबर ते २४ डिसेंबर या कालावधीत लस घेणाऱ्या नागरिकांना ही योजना लागू असेल.

दरम्यान, हिंगोली जिल्हयात कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचं प्रमाण वाढवण्यासाठी प्रशासनातर्फे विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. सर्व सरकारी अधिकारी आणि कर्मचारी यांनी लस घेतल्याचं प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्याचं वेतन जारी करू नये असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

वाशिम जिल्हयात कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी लसीकरण मोहिम वेगानं राबविण्यात येत आहे. जिल्हात 100 टक्के लसीकरण करण्याचा प्रयत्न असून ज्या नागरिकांनी लसीकरण करून घेतले नाही त्यांना दंड आकारण्याची कार्यवाही महसूल विभागातर्फे सुरु आहे. या अंतर्गत आतापर्यंत जिल्ह्यात 38 नागरिकांना एकूण 16 हजार 300 रुपये दंड आकारण्यात आल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे.

<><><><><>

ओमीक्रोनचा धोका लक्षात घेऊन सातारा जिल्हयातल्या म्हसवड इथं होणारी सिद्धनाथ-जोगेश्वरीची तसंच फलटण इथली रामाची यात्रा रद्द करण्यात आली आहे. या दोन्ही यात्रा आणि रथोत्सव येत्या 5 तारखेला होणार होत्या. यापैकी म्हसवड यात्रेला 5 लाख भाविक उपस्थित राहतील असा अंदाज पोलिसांनी वर्तवला होता.

<><><><><>

ओमायक्रॉन' विषाणूच्या पार्श्वभूमीवर महापरिनिर्वाण दिनाला दीक्षाभूमीवर गर्दी टाळण्याचं प्रशासनानं आवाहन केलं आहे. तसंच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा 6 डिसेंबर रोजीचा महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम कोविड-19 च्या पार्श्वभूमीवर पूर्ण खबरदारी घेवून साध्या पध्दतीनं आणि एकत्रित न येता, आयोजित करण्याच्या सूचना नागपूरच्या जिल्हाधिकारी विमला आर. यांनी एका परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत.

<><><><><>

एस. टी. कर्मचाऱ्यांच्या संपामुळे, राज्यात अव्वल स्थान पटकविलेल्या भंडारा एस. टी. आगारातल्या 367 बसगाड्या आणि 19 मालवाहक बसपैकी केवळ 2 बसेस सुरु आहेत. गाड्या आगारात उभ्या असल्या तरी त्या नादुरुस्त होऊ नयेत, यासाठी लाखोच्या घरात देखभाल खर्च करावा लागत आहे.

<><><><><>

मुंबईतल्यापश्चिमनेव्हलकमांडनंनौदलडॉकयार्डमध्येजगातलासर्वातमोठाराष्ट्रध्वजफडकावलाआहे. आजच्यानौदलदिनानिमित्तहाध्वजफडवण्यातआलाआहे. २२५फूटलांबआणि१५०फूटरुंदअसलेल्याध्वजाचंवजनचौदाशेकिलोअसूनतोखादीपासूनबनवण्यातआलाआहे. 'आझादीकाअमृतमहोत्सव'याउपक्रमांतर्गतखादीआणिग्रामोद्योगआयोगानंहाध्वजबनवलाआहे.

<><><><><>

रात्रभरअविरतसुरूअसलेलाकवीकट्टाआणिसकाळीझालेलंगझलसंमेलनत्याचबरोबरप्रथमचआयोजितबाल कुमारसाहित्यसंमेलनासहअन्यवेगवेगळ्याउपक्रमांनी९४व्याअखिलभारतीयमराठीसाहित्यसंमेलनाचादुसरा दिवसरंगला.

कालरात्रीकवीकट्ट्याचेउद्घाटनज्येष्ठसाहित्यिकवात्रटिकाकाररामदासफुटाणेयांच्याहस्तेकरण्यातआलं. स्वातंत्र्यवीरसावरकरकवीकट्ट्यावररात्रीरंगलेल्यायासोहळ्याचेप्रमुखपाहुणेम्हणूनआयपीएसअधिकारीदत्ता कराळेयांच्यासहअन्यमान्यवरउपस्थितहोते. कवीगोविंदकट्ट्यावरआजगझलसंमेलनहीरंगले. ज्येष्ठप्रशासकीयअधिकारीदिलीपपांढरीपट्टेयांनीत्याचेउद्घाटनकेले. कवितादुर्बोधअसूशकते. मात्रगझलहीसोपीअसलीपाहिजे, असेमतपांढरीपट्टेयांनीव्यक्तकेले. दरम्यानरामदासभटकळयांचीमुलाखत, तसंच.ऐसीअक्षरेअंतर्गतअच्युतपालवयांनीसादरकेलेल्यासुलेखनप्रात्यक्षिकांनाउस्फुर्तप्रतिसादमिळाला.

**<><><><>**

नाशिकमध्ये आज १५ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनालाही**आज** सुरुवात झाली. सकाळी शहरातल्या हुतात्मा स्मारक येथून विद्रोही साहित्य - संस्कृती विचार यात्रा काढण्यात आली. या यात्रेत शालेय विद्यार्थ्यांसह दलित, आदिवासी, विद्रोही सांस्कृतिक परंपरेच्या विविध संघटनांनी सहभाग घेतला. यावेळी संमेलनाचे उद्घाटक डॉ. गौहर रझा, मावळते अध्यक्ष डॉ. प्रल्हाद लुलेकर, स्वागताध्यक्ष शशीकांत उन्हवणे, विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. आज दुपारी संमेलनाचं औपचारिक उद्गाघन होणार असून उद्या याचा समारोप होणार आहे.

**<><><><>**

सिंधुदुर्ग जिल्हा बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याचा काल शेवटचा दिवस होता. १९ जागांसाठी ही निवडणूक होत असून शेवटच्या दिवशी एकूण ९१ अर्ज दाखल झाल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे. येत्या सोमवारी या अर्जांची छाननी होणार असून २१ डिसेंबर २०२१ पर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे.

**<><><><>**

वरळीतल्या सिलेंडर स्फोटात होरपळून गंभीर जखमी झालेल्या चिमुकलीचा मृत्यू नायर रुग्णालयातल्या डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झाल्याचं समोर आलं आहे. या घटनेविरोधात काल स्थायी समितीत सर्वपक्षीय तीव्र पडसाद उमटले. या प्रकरणी संबंधित डॉक्टरांना निलंबित करण्यात आलं असून नियुक्त करण्यात आलेल्या समितीमार्फत चौकशी सुरु झाली आहे. येत्या ८ दिवसांत समिती अहवाल सादर करणार असून, त्या अहवालानुसार कारवाई केली जाईल, असं मुंबई महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

पालघर जिल्ह्यात आज विविध ठिकाणी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. क्रांती ज्योत दिव्यांग विकास संस्थेकडून दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांसाठी मार्गदर्शन शिबीराचं आयोजन करण्यात आलं होतं. तसंच यावेळी उपस्थित दिव्यांगांना काही भेट वस्तू ही देण्यात आल्या. या दिनाचं औचित्य साधून नवापूरच्या जिल्हा परिषदेच्या मत्स्यशाळेच्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी नवापूर गावात प्रभातफेरी काढून जनजागृती केली. तसंच शाळेत चित्रकला स्पर्धेचं ही आयोजन करण्यात आलं होतं.

<><><><><>

सोलापूर जिल्हा परिषदेचे शिक्षक रणजितसिंह डिसले यांना अमेरिकन सरकारकडून दिली जाणारी प्रतिष्ठित ‘फुलब्राईट शिष्यवृत्ती’ जाहीर झाली आहे. यावर्षी जगभरातल्या एकूण ४० शिक्षकांना ही प्रतिष्ठेची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. ‘पीस इन एज्युकेशन’ या विषयावर अमेरिकेतल्या विद्यापीठात अधिक संशोधन करण्यासाठी त्यांना ही शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. ‘लेट्स क्रॉस द बॉर्डर’ या उपक्रमाच्या माध्यमातून जगभरातल्या अशांत देशांमधल्या मुलांना एकत्र आणून त्यांच्यात अहिंसेच्या विचारांचा प्रसार करण्याचं काम डिसले करत आहेत.

<><><><><>

भारतआणिन्यूझीलंडयांच्यातमुंबईतसुरुअसलेल्यादुसऱ्याक्रिकेटकसोटीसामन्यातन्यूझीलंडचाफिरकीगोलंदाजएजाजपटेलयानंएकाचडावातसर्वदहागडीबादकरायचीऐतिहासिककामगिरीनोंदवली. सामन्याच्यादुसऱ्यादिवशीएजाजपटेलनंपहिल्याडावात११९धावांमध्येभारताचासर्व१०गडीबादकेले. अशीकामगिरीकरणारातोइंग्लंडचाजीमलेकरआणिभारताचाअनिलकुंबळेयांच्यानंतरचाकेवळतीसराचगोलंदाजठरलाआहे. पहिल्याडावातभारताने३२५धावाकेल्याआहेत. यानंतरपहिल्याडावातफलंदाजीसाठीआलेलान्यूझीलंडचीभारताच्यागोलंदाजीसमोरघसरणझाली. चहापानापर्यंतन्यूझीलंडच्या६गडीबाद३८धावाझाल्याहोत्या. भारताचाजलदगतीगोलंदाजमोहम्मसिराजनंन्यूझीलंडचेआघाडीचे३गडीबादकेले, तरअक्षरपटेल, आर.अश्विनआणिजयंतयादवयांनीप्रत्येकीएकगडीबादकेला. त्याआधीआजसामन्याच्यादुसऱ्यादिवशीभारतानंकालच्या४गडीबाद२२१धावांवरूनआपलाडावपुढेसुरुकेला. मात्रएजाजपटेलयाच्याफिरकीसमोरठराविकअंतरानंभारताचेफलंदाजबादहोतगेले. शतकवीरमयांकअगरवालनंअक्षरपटेलसोबत६७धावांचीभागिदारीकरतकरतभारताचाडावसावरायचाप्रयत्नकेला. मात्रत्यालाइतरफलंदाजांचीसाथमिळूशकलीनाही. मयांकयानंदीडशेतरअक्षरपटेलनं५२धावाकेल्या.शेवटचंवृत्तहातीआलंतेव्हान्यूझीलंडचे५३धावांवर७गडीबादझालेहोते.

<><><><><>